## लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन*

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ७६ व्या पुण्यतिथी निमित्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य योगेश गायकवाड सर यांच्या अध्यक्षतेखाली अभिवादन सभेचे आयोजन करण्यात करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निदेशक संभाजी जाधव यांनी केले. यामध्ये त्यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन चरित्राचा थोडक्यात आढावा घेतला. अहिंसेच्या मार्गाने केलेला सत्याग्रहाने बलाढ्यातल्या बलाढ्य शत्रूला नमवता येतं, असा संदेश साऱ्या विश्वाला देणारे महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याचा गौरव या कार्यक्रमातून करण्यात आला. लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सर्व शिक्षक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, आणि विविध व्यवसायामध्ये प्रशिक्षण घेत असणाऱ्या 70 विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




vivo Y100 · Shot on by Sourabh